**मा.नाम. शरदराव पवार**
**(संरक्षणमंत्री) भारत सरकार**
**१७ नोंव्हेंबर, १९९१**

मा.कुलगुरू, विद्यापीठाच्या वेगवेगळ्या विद्याशाखांचे अधिष्ठाते, अधिसभेचे आणि कार्यकारी परिषदेचे सदस्य, आज प्रमाणपत्रे प्राप्त करणारे पदवीधर, डॉक्टर आणि बंधु–भगिनींनो,

१. या दीक्षान्त समारंभात भाषण करण्याचे आमंत्रण देऊन आपण माझा बहुमान केलात, त्याबद्दल प्रथम कृतज्ञता व्यक्त करणे माझे कर्तव्य आहे. कोल्हापूर आणि त्याचा करवीर परिसर यांना ऐतिहासिक परंपरा आहे. ज्ञान, कला, क्रीडा, साहस व समाजसुधारणा या साऱ्या क्षेत्रांत कोल्हापूर अग्रेसर राहिलेले आहे. याचे श्रेय प्रामुख्याने या क्षेत्रात विकासाला पोषक असे वातावरण निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करणाऱ्या राजर्षी शाहू महाराजांच्या असामान्य नेतृत्वाला आहे. राजर्षी शाहू महाराज केवळ लोकप्रिय राजे नव्हते, तर खऱ्या अर्थाने समाजाच्या सर्व थरांतील जनतेत आत्मोद्धाराची व सृजनशीलतेची चेतना निर्माण करणारी प्रेरक शक्ती होते. त्यांनी केलेले कार्य, त्यांची दूरदृष्टी व सामान्य–विशेषत: दलित व मागास–जनतेबद्दल बावनकशी कळकळ सिद्ध करणारे होते. सामाजिक व आर्थिक क्रांतीचा पाया घालण्यासाठी त्यांनी जातिव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी धाडसी पावले टाकली. १९०२ साली संस्थानाच्या शासनातील ५० टक्के जागा मागास वर्गासाठी राखून ठेवण्याचा निर्णय घेतला. महात्मा फुले यांनी पेटवलेली सार्वजनिक शिक्षणाची ज्योत खेडोपाडी नेण्यासाठी १९१७ मध्ये प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचे पाऊल उचलले आणि ठिकठिकाणी ग्रामीण व गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे बांधली. अस्पृश्यांच्यापासून मुलींच्यापर्यंत सर्वांच्या शिक्षणासाठी सोयी–सवलती उपलब्ध करून दिल्या. इन्फन्ट्री स्कूल, पाटील स्कूल, टेक्निकल इन्स्टिटय़ूट, शिक्षण प्रशिक्षण केंद्र, राजाराम कॉलेज आदींच्या द्वारे सामान्य जनतेला सुशिक्षित व व्यवसायप्रवण बनवण्यासाठी शिक्षण संस्थांचे जाळे संस्थानभर पसरवले. शिक्षणाची गंगा जनसामान्यांपर्यंत पोचवण्याच्या राजर्षींच्या या प्रयत्नांतूनच स्फूर्ती घेऊन कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख, रावसाहेब भाऊसाहेब थोरात, भाऊसाहेब हिरे, व्ही.टी.पाटील, बाबुराव जगताप, मामासाहेब जगदाळे, बापूजी साळुंखे इत्यादी समाजधुरिणांनी सार्वजनिक शिक्षणाचे कार्य पुढे चालवले. राजर्षींचा हा उज्वल वारसा आपल्या शिवाजी विद्यापीठाला लाभला आहे व तो काळजीपूर्वक जतन करायचा आहे.

२. देशातील इतर प्रतिष्ठित विद्यापीठांच्या मानाने आणि त्यांनी प्रस्थापित केलेल्या परंपरांच्या संदर्भात आपले विद्यापीठ वयाने कनिष्ठ आहे. त्याला अद्याप तीस वर्षेही पूर्ण झालेली नाहीत.

तरीही, या अल्पकाळातही, आपल्या विद्यापीठाने कला, विज्ञान, वाणिज्य, सामाजिक शास्त्रे, ललित कला, कायदा, वैद्यक. अभियांत्रिकी शिक्षण, आयुर्वेदिक औषधे, खेळ वगैरे विविध शाखांत प्रशंसनीय कामगिरी केली आहे. एवढ्या अल्पकाळातही या विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी पाचशेपेक्षा अधिक शोध प्रबंध सादर केले आहेत ही खरोखरच अभिमानाची बाब आहे. कोल्हापूर परिसराला विद्याव्यासंगाची परंपरा आहे, तिच्याशी हे सुसंगतच आहे. म्हणूनच आज पदवी घेणाऱ्या सर्वांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. पण त्याचबरोबर एक सावधगिरीचा इशाराही द्यावासा वाटतो. पदवी प्राप्त झाली म्हणजे अध्ययन संपले असे नाही. ज्ञानसाधना हे आयुष्यभर चालवण्याचे व्रत आहे. खुद्द तुमच्या विद्यापीठाचे ब्रीदही "ज्ञानमेवामृतम्" हे आहे म्हणजे ज्ञान हेच जीवनाचे अमृत आहे. आज पदवी मिळाल्यानंतर तुमचा ज्ञानसंपादनाचा खरा प्रारंभ होणार आहे. कारण ज्ञान हे सतत वाढणारे आहे. जेवढे तुम्ही संपादन कराल तेवढे कमीच आहे.

३. आपण आता विसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकांत प्रवेश केला आहे. आणि हे दशक आजवरच्या कोणत्याही काळापेक्षा जास्त क्रांतीकारक उलथापालथीचे ठरेल, अशी चिन्हे आहेत. गेल्या काही वर्षातील घडामोडींमुळे आजवर उराशी बाळगलेले अनेक विचार, सिद्धांत वा संप्रदाय कालबाह्य ठरले आहेत. नवे विचार व आचार–प्रवाह उदयास येत आहेत. त्याचबरोबर विज्ञान–तंत्रज्ञानाची कधी नव्हे एवढ्या वेगाने प्रगती होत आहे. लंडनच्या इकॉनॉमिस्ट या साप्ताहिकाने काही वर्षापूर्वी व्यक्त केलेल्या अंदाजानुसार मानवजातीच्या इतिहासाच्या प्रारंभापासून दुसऱ्या महायुद्धाच्या काळापर्यंत जेवढे शास्त्रीय ज्ञान निर्माण झाले होते, तेवढे ज्ञान दुसऱ्या महायुद्धापासून १९८५ पर्यंतच्या सुमारे ४५ वर्षांच्या काळात निर्माण झाले आणि आता जगातील शास्त्रीय ज्ञान दर आठ वर्षांनी दुप्टीने वाढत आहे. विज्ञान–प्रगतीच्या या रेट्यामुळे पारंपारिक समाज–बंधने व व्यवस्था विस्कळीत होत आहेत. नवे सामाजिक, आर्थिक व राजकीय आकृतिबंध निर्माण होत आहेत. हा ज्ञानाचा स्फोट सामान्यांच्याच नव्हे, तर सुशिक्षितांच्याही आकलनशक्तीपलीकडे जाऊ लागला आहे. काही वर्षापूर्वी आत्मसात केलेले शास्त्रीय ज्ञानही आज पुराणे व अपुरे ठरू लागले आहे. टी.व्ही., व्ही.सी.आर., कॉम्प्युटर, फॅक्स, यंत्रमानव (Robot) इत्यादि उपकरणांमुळे जीवनपद्धतीत आमूलाग्र बदल घडून येत आहेत. घरबसल्या ऑफिस काम करण्याची, कामगारांशिवाय कारखाना चालविण्याची, किंवा घरात राहूनच शिक्षण घेण्याची शक्यता निर्माण झाली आहे. माहिती–युगातील या साऱ्या घडामोडींचा अर्थ व त्यांचा वैयक्तिक व समाज जीवनावर होणारा परिणाम यांचा अजून पुरेसा अंदाज येणे कठीण आहे. म्हणूनच आता केवळ हे ज्ञान देणे एवढेच नव्हे तर आपल्या विद्यमान परिस्थितीत त्यातील कोणते ज्ञान–विज्ञान स्वीकारणे व अंमलात आणणे कितपत हितकारक ठरेल याचा निर्णय घेण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे हेही विद्यापीठ शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे.

या संदर्भात सुप्रसिद्ध इंग्लिश कवी आणि नोबेल पारितोषिक विजेते T. S. Eliot यांनी आपल्या एका कवितेत विचारलेल्या प्रश्नांची आठवण करून देणे समर्पक ठरेल –

Where is the wisdom we have lost in knowledge?
Where is the Knowledge we have lost in information?

म्हणजेच विद्यापीठ शिक्षणाचा उद्देश केवळ आवश्यक ते ज्ञान व कौशल्य प्राप्त करून देणे एवढाच नाही, तर विद्यार्थ्यांना विवेकशील, सुसंस्कृत आणि समाजोपयोगी बनवणे हा आहे.

४. भारताला आजच्या माहितीयुगात स्वतःचे योग्य ते स्थान मिळवायचे आहे. पण त्यासाठी आपल्याला अजून बराच लांबचा पल्ला गाठायचा आहे. खानेसुमारीनुसार भारतात आज ३२ कोटीपेक्षा जास्त लोक निरक्षर आहेत. याबाबतीत विद्यापीठांना निश्चितच साक्षरता प्रसाराची सामाजिक जबाबदारी स्वीकारता येईल. त्याचबरोबर केवळ साक्षरता प्रसारच नव्हे, तर जनतेला सुविद्य बनवणे जरूर आहे. त्यासाठी जे आधुनिक ज्ञान–विज्ञान विद्यापीठात दिले जाते त्याची जनतेला निदान तोंड ओळख करून देण्यासाठी विद्यापीठांनी Extension Serices कार्यक्रम घेऊन ते ज्ञान प्राथमिक स्वरूपात तरी जनतेपर्यंत पोचेल याची व्यवस्था करणे हितावह ठरेल. त्यामुळे आधुनिक ज्ञान–विज्ञानाचा दैनंदिन जीवनात कसा उपयोग करता येईल हे सामान्य लोकांना कळू शकेल.

याचा अर्थ विद्यापीठांनी एकेकाळची Ivory Tower ची भूमिका सोडून आता अधिकाधिक समाजभिमुख होणे जरूर आहे. प्रचलित सामाजिक संदर्भ वा गरजा यांच्याकडे दुर्लक्ष करून केले जाणारे विद्यादान हे समाजविकासालाच नव्हे तर व्यक्तिविकासालाही अखेरीस निरूपयोग ठरते. म्हणूनच विद्यापीठ आणि त्याचा परिसर यांच्यात परस्पर देवाण–घेवाणीचा दुवा प्रस्थापित करणे व प्रचलित गरजांवर आधारित असे नवेनवे अभ्यासक्रम तयार करणे हे आज विद्यापीठांपुढील सृजनशील आव्हान आहे.

५. या संदर्भात आपल्या विद्यापीठात कोणते नवे अभ्यासक्रम सुरू करता येतील याचा विचार व्हायला हवा. संरक्षण मंत्री असल्यामुळे देशाच्या संरक्षणाशी संबंधित अभ्यासक्रम शिवाजी विद्यापीठात स्थापन व्हावा असे मला वाटणे साहजिकच आहे. याला आणखी एक कारण म्हणजे या परिसराला असलेली सैनिकी परंपरा. जी शाहू छत्रपतींनी इन्फन्ट्री स्कूल स्थापून जोपासण्याचा प्रयत्न केला होता. तसाच दुसरा अभ्यासक्रम Tourism च्या शिक्षणाचा तयार करता येईल. या क्षेत्राकडे आजवर हवे तितके लक्ष पुरवले गेलेले नाही. आज पर्यटन हा जगातील सर्वात मोठा उद्योग बनत आहे. American Society of Traval Agents च्या अंदाजाप्रमाणे या दशकांत दरवर्षी ५० कोटी प्रवासी आंतरराष्ट्रीय प्रवास करू लागतील. गेल्या वर्षी सुमारे १३ लाख परदेशी पर्यटकांनी भारताला भेट दिली व त्यामुळे सुमारे २१०० कोटी रूपयांचे परकीय चलन आपल्याला लाभले. या

अपेक्षित ५० कोटीपैकी एक टक्का पर्यटक जरी आपण आपण आकर्षित केले तरी ५० लाख परदेशी प्रवासी दरवर्षी भारतात येतील. त्यांच्यामार्फत मिळणारे परकीय चलन व त्यांच्या पर्यटनामुळे भारतात निर्माण होणारे रोजगार यांचा अंदाज केला म्हणजे या विषयाचे महत्त्व पटेल. पण त्यासाठी आवश्यक असलेल्या सुविधा, माहिती, वहातुक व्यवस्था वगैरे बाबतीत प्रशिक्षण देणारा अभ्यासक्रम तयार करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे प.महाराष्ट्राच्या परिसरात घडत असलेल्या परिवर्तनामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक, आर्थिक व तांत्रिक गरजांचा विचार करूनही अनेक अभ्यासक्रम तयार करता येतील. या परिसरातील साखर व इतर कारखानदारी, फलोद्यान प्रकल्प, सहकारी संस्थांचे वाढते जाळे इत्यादी पार्श्वभूमीवर फळ–प्रक्रिया, शेतीमाल–प्रक्रिया, सहकारी संस्थांचे व्यवस्थापन वगैरे विषयांवर आपल्या विद्यापीठात अभ्यासक्रम सुरू करता येतील. त्यामुळे परिसराच्या विकासाला हातभारत लागेल व विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचेही सार्थक होईल.

६. हे सर्व करतानाच प्रचलित शिक्षणपद्धतीचाही आमूलाग्र विचार होणे जरूर आहे. आज शिक्षण क्षेत्रातून पूर्वीची ध्येय–निष्ठा नाहीशी होत आहे. अर्थकारण व राजकारण यांचा अधिकाधिक, पगडा बसत चालला आहे. शिक्षण–प्रसार हा आता किफायतशीर व्यवसाय बनू लागला आहे. त्याचबरोबर प्रचलित परीक्षा पद्धतीमध्ये यांत्रिकीपणा येऊ लागला आहे. त्यामुळे ट्यूशन क्लासेस व गाईडस् यांचे वारेमाप पीक येऊ लागले आहे. या सगळ्यातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी असंख्यांना बेकारांच्या फौजेत भरती व्हावे लागत आहे. उत्तीर्ण झालेल्यांपैकी अनेक धड चार वाक्ये इंग्रजीतून वा चार मिनिटे शुद्ध मराठीतूनही बोलता येत नाही अशी वस्तुस्थिती आहे. असे युवक आधुनिक जगाची आव्हाने पेलण्यास असमर्थ ठरतात व स्वाभाविकत: ते वैफल्य व हिंसाचार यांच्या आहारी जातात. राधाकृष्णन् कमिशन, कोठारी कमिशन आदि निरनिराळ्या अधिकारी व्यक्तींच्या आयोगांनी भारतातील शिक्षणाचा सर्वांगीण विचार करून अहवाल सादर केलेले आहेत. त्या सर्वांचा प्रचलित परिस्थितीच्या संदर्भात फेरविचार केला जाऊन या समस्यांची वस्तुनिष्ठ व व्यवहार्य उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला जावा असे मला वाटते.

७. येथे मिळालेल्या ज्ञानाची व कलाकौशल्यांची शिदोरी घेऊन तुम्ही आता बाहेरच्या अफाट जगात जात आहात. या प्रवासात येथे मिळवलेले ज्ञान–कौशल्य तुम्हाला मार्गदर्शक म्हणून उपयोगी पडेल. पण केवळ या शिदोरीवर संतुष्ट राहून तुम्हाला सर्वकाळ मार्गक्रमण करता येणार नाही. अर्थशास्त्राच्या भाषेत सांगायचे म्हणजे विद्यापीठात मिळवलेले ज्ञान–कौशल्य व अनुभव यांचा उपयोग बीज–भांडवल (Seedmoney) किंवा बीज–ज्ञान कौशल्यांसारखा करायचा आहे. त्याच्या आधाराने व त्यात सतत भर घालीत यापुढे तुमचे आयुष्य तुम्हाला स्वत:च घडवायचे आहे. पण

आत्मविकासाबरोबर लोकशाहीतील सुबुद्ध नागरिक या नात्याने विकासाचा जो अपूर्व प्रयोग भारतात चालू आहे, त्यातही सामील होऊन हातभार लावायचा आहे. तुम्ही तरूण आहात, उत्साही आहात. तरूणपण हे आदर्शवादीही असते. नव्या जगाचे शिल्पकार असते. त्याला नवे घडवायची ओढ असते. तुमची उमेद, तुमच्या आशा–आकांक्षा आणि तुमची स्वप्ने उदंड आहेत. त्याच्याच जोडीला वास्तवाचे भान ठेवून त्याला इष्ट वळण लावण्याचा प्रयत्न तुम्ही जिद्दीने केलात, तर आमच्या पिढीला साध्य होऊ शकले नाही ते तुम्ही साध्य करू शकाल. या तुमच्या प्रयत्नांना माझ्या हार्दिक शुभेच्छा आहेत.

सर्व नवीन स्नातकांचे व पदवीधरांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. भावी कारकीर्दीत यशाच्या एकेक पायऱ्या चढत असतांना तुम्ही समाजातील जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त हित साधण्याचा प्रयत्न कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

जय हिंद! जय महाराष्ट्र !

❏❏❏